R.N.I No.MAH MAR/2000/1741
स्थापना : 1884
Postal Reg. No. G2/RNP/SLP/F10/2013-15
ISSN 2229 - 5852 JAINBODHAK



# जैनबोधक

मराठी

श्री १००८ भगवान महावीर
श्रीक्षेत्र तळणेवाडी (गेवराई) बीड

वर्ष - 129 ■ अंक - 22 ■ वीर संवत् 2539 ■ 16-28 फेब्रुवारी 2013 ■ मूल्य ₹ 15



## कषायच सर्वविनाशी

*-श्वेतपिच्छाचार्यश्री विद्यानंद मुनिराज*

ॐ नमः।

महानुभावांनो, आपण जाणताच की, क्रोध आणि मान हे द्वेष उत्पन्न करतात. मोहनीय कर्माची दोन अपत्ये आहेत- राग आणि द्वेष. रागाचीही दोन अपत्ये आहेत- लोभ आणि मायाचार. तसेच द्वेषाचीही दोन अपत्ये आहेत- क्रोध आणि मान. यांचा संबंध अनंतानुबंधीशी आहे. सांगण्याचे तात्पर्य हे आहे की संसार, शरीर आणि भोग यांच्याविषयी जे विरक्तभाव बाळगतात, त्यांनाच सम्यग्दृष्टी असे म्हणतात. बंधाला निमित्त असलेल्या देहाशी संबंधित ईर्षा, राग-द्वेष, मोह, मत्सर या गोष्टी तो करत नाही. 'अध्यवसान' या शब्दाची फारच सुंदर व्युत्पत्ती दिली गेली आहे. अति हर्ष करणे, एखाद्या वस्तूची प्राप्ती झाली असता हर्षित होऊन फिरत राहणे, व्यर्थ चिंतेत स्वतःला बुडवून टाकणे, एखाद्याशी राग करणे, एखाद्याशी स्नेह करणे, एखाद्याचा द्वेष करणे, इष्टानिष्ट बुध्दीमध्ये गुरफटून जाणे, अशा रीतीने भय, स्नेह इत्यादी नाना प्रकारच्या शब्दांसाठी 'अध्यवसान' हा एकच शब्द वापरला. 'अध्यवसान' हा अतिशय वैज्ञानिक शब्द आहे.

महानुभावानो! सांगण्याचे तात्पर्य हे आहे की, बंधाला निमित्तभूत अशा नाना प्रकारच्या ज्या मोहरूपी वस्तू आहेत- उदाहरणार्थ शरीर, संसारातील पदार्थ वगैरे, हे सर्व नाना प्रकारच्या अध्यवसानाच्या उदयामुळे आहेत. त्यांनी राग उत्पन्न होतो. परंतु, सम्यग्दृष्टी जीव अशा प्रकारचा राग उत्पन्न होऊ देत नाही, कारण- 'राग आग दहे सदा ताते समामृत सेइये।' राग संसाराला वाढविणारा आहे. मोहाला, रागाला, 'जयधवला' मध्ये चांगलाही म्हटले आहे. पण कसा? उदाहरणार्थ आपल्याला शास्त्राचा लोभ असेल तर त्याला सांभाळून ठेवा, कारण सकाळी ते आपल्याला वाचायचे आहे. जपमाळ आहे, तिला जपून ठेवा, कारण मंदिरात जाऊन ती जपमाळ जपायची आहे. अशा प्रकारचा जो लोभ आहे, त्याला आचार्यांनी मनाई केली नाही. रत्नत्रयाचे साधनस्वरूप जितक्या म्हणून वस्तू आहेत त्या कार्यकारी आहेत. सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्रविषयी जो कथंचित राग आहे तो कार्यकारी आहे, संसारातील जितक्या वस्तूंविषयी राग वाढेल तितकाच संसार वाढत जाईल आणि रत्नत्रयाच्या प्राप्तीसाठी, वीतरागतेच्या वस्तूविषयी जितका राग वाढेल, तितका राग संसाराचा अवधी कमी करील आणि मोक्षमार्गाच्या दिशेने त्याला पुढे नेईल. रत्नत्रयाच्या सर्व साधनांविषयीचा राग मोक्षाचे कारण आहे, असे जयधवलामध्ये म्हटले आहे.

ज्ञानी आणि अज्ञानी यांच्यामध्ये महान अंतर आहे. अज्ञानी स्वतःला व्यर्थ गोष्टींमध्ये गुंतवून ठेवतो, परंतु ज्ञानी स्वतःला व्यर्थ गोष्टीत गुंतवत नाही. त्यांना तत्काळ विसरून जातो.

णाणी रागप्पजहो, हि सव्वदव्वेसु कम्म-मज्झगदो।
णो लिप्पदि रजएण दु कद्दम-मज्झे जहा कणयं ॥२१८॥
अण्णाणी पुण रत्तो, हि सव्वदव्वेसु कम्म-मज्झगदो ।
लिप्पदि कम्मरयेण दु, कद्दम-मज्झे जहा लोहं ॥२१९॥



भ. आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, मंगलोर (कर्नाटक) (Photo-Dr.K.Samudravijay-Mumbai)

**प्रेरक व्यक्तिमत्व, असामान्य कर्तृत्व, दातृत्व आणि औद्योगिक नेतृत्व**

# धर्मानुरागी पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन, जळगांव

●सौ. सुरेखा शहा, *सोलापूर.*

आपल्या हिरव्या बोलीने संवाद साधणाऱ्या आणि जैन हिल्सच्या सृजनाची गाथा सांगणाऱ्या बोलक्या टेकड्या, या उजाड प्रतिसृष्टी निर्माण करणारे शेतकऱ्यांसाठी तंत्र, कृषिज्ञानाचे जणू विद्यापीठ निर्माण करणारे अन् आकाशातील मेघातून वर्षित होणारे पावसाचे थेंब थेंब पाणी साठवून लाखो वृक्षाचे नंदनवन करून तिथेच आदर्श उद्योगनगरी निर्माण करणारे, पद्मश्री डॉ. भवरलालजी जैन म्हणजे केवळ जैन समाजाचेच नव्हे तर भारताचे भूषण आहेत.

डॉ. भवरलालजी जैन यांच्या औद्योगिक, पर्यावरण विकासात्मक, तात्विक विकासाचे चकित करणारे दर्शन त्यांनी निर्माण केलेल्या जैनहिल्सवर दिसते आणि आपण भावविभोर होतो. स्वप्नांच्याही पलीकडचे असे अद्‌भुत अतर्क्य, विशाल, शेतकरी व मानवतेच्या विकासाचे जीवनदायी स्वप्न भवरलालजींनी स्वहस्ते साकार केलेय, त्यासाठी त्यांनी आपले जीवनच समर्पित केलेय, भारतात तशी जैन हिल्ससारखा प्रकल्प अन्यत्र कुठे दिसणार नाही.

जैन हिल्सच्या स्वर्गीय भासणाऱ्या परिसरात, टेकड्यावर, दरीत हजारो आंब्याची घनदाट राई, कडुनिंबाच्या आरोग्यदायी वृक्षांची दरीतील वने, टेकड्यांच्या अंगांगावरचे वळणदार सुरेख रस्ते, तलाव, नैसर्गिकरीत्या तयार केलेले जंगल, त्यातील विहरणारे वन्य प्राणी व पक्षी या पार्श्वभूमीवरचे भवरलालजींचे कार्यालय, अतिथीगृहे, जैन गुरुकुलसारखी भव्य निवासस्थाने, नर्सरी, त्यात गांडूळ खताची निर्मिती व प्रात्यक्षिके दाखवितात.

भवरलालजींना इकडे भाऊ असे म्हणतात. त्यांचे अत्यंत अद्यावत व सुंदर असे वैयक्तिक वाचनालय, जैन उद्योगांच्या विशाल इमारती, अन्नप्रक्रिया विभागाचे कारखाने, आंबा, डाळिंब, केळी व इतर फळभाज्या इत्यादी विभाग, यातील सर्व माल उत्पादन, केळीच्या रोपांची प्रयोगशाळा, त्यातून दरवर्षी करोडोंच्या वरती रोपांचे उत्पादन होते. पाहुण्यांसाठी अहोरात्र खुल्या



पद्मश्री भवरीलालजीसोबत लेखिका

असलेल्या भोजनशाळा, त्याला 'भोजगृह' असे सार्थ नाव आहे. दरवर्षी देशातून व परदेशातून जैन हिल्स पाहण्यासाठी चाळीस पन्नास हजार शेतकरी, परदेशी पाहुणे व विद्यार्थी येतात, त्यांच्या सुग्रास भोजनाची सोय इथे आहे ती देखील विनामूल्य.

वेगवेगळ्या प्रकारच्या ठिबक सिंचनाच्या प्रात्यक्षिकाच्या स्थळाला शेतकऱ्यांची बस्ती असे समर्पक नाव दिले आहे. हे सारे पाहताना व अनुभवताना वाटते की ही तर शेतकऱ्यांच्या प्रगतीची गंगोत्री, जलक्रांतीचे साक्षात दर्शन! इथे वर्षातून काही वेळा शेतकऱ्यांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे परिसंवाद, प्रात्यक्षिके, तज्ञांची व्याख्याने होतात, त्यात परदेशी तज्ञही असतात.

आपल्या स्वप्नाना साकार करण्यासाठी भवरलालजींनी समोरच्या टेकडीवर अनुभूती स्कूल साकारले आहे. त्यात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतोय, महात्मा गांधीजींच्या तत्त्वज्ञानानी प्रभावित झालेल्या भवरलालजींनी इथेच अत्यंत भव्य असे गांधी प्रतिष्ठान निर्माण केले आहे. तेथे महात्मा गांधीजींचे प्रकाशित लेख, पुस्तके, दुर्मिळ छायाचित्रे, पत्रे वगैरेंचा संग्रह आहे.

शून्यातून विश्व निर्माण करणारे, देशात व परदेशात आपले औद्योगिक साम्राज्य प्रस्थापित करणाऱ्या भवरलालजींचा उद्योग समूह सध्या जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे, पुढच्या वर्षी तो निश्चित पहिल्या क्रमांकावर असणार हा विश्वास. येथील टेकड्यावरील वळणावळणाचे सुंदर रस्ते, बहरलेल्या फुलबागा पाहताना डोळ्यांचे पारणे फिटते.

पद्मश्री भवरलालजी देशप्रेमी, मातृपितृभक्त, निसर्गप्रेमी संरक्षक आहेत. उत्तम वक्ते व उत्कृष्ट लेखक आहेत. त्याचबरोबर त्यांच्या हृदयात एक निरासक्त यती नांदतोय. त्यामुळे आपल्या संपत्तीचा त्यांनी ट्रस्ट केला आहे. त्यांच्या चार पुत्रानींही ह्यासाठी संमती दिली आहे.

जैन हिल्स म्हणजे माननीय भवरलालजीनी साकार केलेले महास्वप्न आहे. ती विकासाची कर्मभूमी, औद्योगिक मोहोर उठविणारी ही भूमी, येथील जैन गुरुकुल समोरच्या मैदानावर तिरंगा अभिमानाने फडकत असतो.

*(पुढील मजकूर पृष्ठ 14 वर)*

ISSN 2229 - 5852 JAINBODHAK

# सृष्टी बदलण्या ऐवजी दृष्टी बदला : दुःखात सुखाची अनुभूती होऊ लागते.

● महेंद्रकुमार जैन

मानव जन्म अत्यंत मौल्यवान आहे. जगण्यासाठी मोजके आयुष्य अर्थात मर्यादित श्वास मिळाले असतात. तेवढ्या मर्यादित कालावधीत जीवनाच्या परमध्येयास प्राप्त करून घ्यावयाचे (ध्येयसिध्दी) आहे. जीवन म्हटले की सुखदुःख येणारच. एकसारखे जीवन वाट्याला आले तर सुखाचा आनंद आणि दुःखाची तीव्रता समजलीच नसती. म्हणून जीवनात सुख-दुःख येणे अनिवार्य आहे. दुःखानंतर सुख प्राप्त झाले तर सुखाचा आनंद काही वेगळाच असतो. सुखानंतर दुःख आले तर त्याची तीव्रता अधिक जाणवते. म्हणून सुख-दुःखाच्या काळात समताभाव ठेवावा. म्हणतात ना-

**'सुख आये नाचे नहीं,**
**दुःख आये नहीं रोय**
**दोनों में समता रही,**
**तो ही मंगल होय।'**

अर्थात सुखाच्या काळात हुरळून जाऊ नये त्याचप्रमाणे दुःखाच्या काळात उदास, निराश होऊ नये. दोन्ही अवस्थेत समताभाव ठेवावा म्हणजे जीवन मंगलमय होईल.

उंबरठा ओलांडल्याशिवाय अंगणात प्रवेश करता येत नाही. तद्वत चांगला शिष्य बनल्याशिवाय त्यास गुरुपदावर आरूढ होता येत नाही. द्वितीयेचा चंद्र क्रमाक्रमाने पौर्णिमेचा चंद्र बनू शकतो, परंतु जो द्वितीयेचाच चंद्र बनून राहतो त्याला पूर्णचंद्र होता येत नाही.

सोने अग्नीत नष्ट होत नाही. ते तापून अधिक शुध्द होते. देवावरील खऱ्या श्रध्देच्या अभावात सोन्याची लंका जळाली परंतु, त्याच लंकेतील रामभक्त बिभीषणाची झोपडी मात्र जळली नाही. हे सर्व बिभीषणाच्या अचाट रामभक्ती आणि श्रध्देमुळे घडले. म्हणून प्रत्येक जीवाची खऱ्या देव-गुरु-शास्त्रावर नितांत श्रध्दा असावी लागते. त्याच्या नामस्मरणामुळे दुःखं व संकटं दूर होतात आणि ईश्वराची अनुभूती होऊ लागते. निष्काम भक्तीचा प्रादुर्भाव, अटळ आत्म-विश्वास आणि आत्मश्रध्देमुळेच शक्य आहे.

सत्संग, तप, त्याग आणि संयमामुळेच मानवजीवन उजळून निघते. साधकाच्या लुप्त झालेल्या चेतनेच्या आत्मशक्तीची जागृती आणि विकास होण्यास प्रारंभ होतो. माणसाच्या विचारात अनेकांत वाणीत स्याद्वाद, आचरणात अहिंसा, व्यवहारात अपरिग्रह ही जीवनाची मूळ सूत्रे आहेत. यांच्यामुळेच जीवन आध्यात्मिक, त्यागमय, करुणामय आणि परोपकारी बनते. याला इतिहास साक्षी आहे.

डॉ. हेलन केलर दीड वर्षाची असताना तीव्र तापाने आजारी पडल्या. या आजाराचा त्यांच्या शरीरावर विपरीत परिणाम झाला. त्यांच्या ऐकण्याची, पाहण्याची आणि बोलण्याची शक्ती नष्ट झाली. त्यांच्या आईने अनेक डॉक्टरांना दाखविले, उपचार घेतले परंतु, त्यांचा काहीच उपयोग झाला नाही. काही वर्षांपर्यंत त्या दृष्टिहीन राहिल्या.

त्या काळात डोळ्याचे प्रख्यात डॉ. एनेग्नास हे होते. त्यांनी हेलेन केलरच्या डोळ्यांचे नऊ जटिल ऑपरेशन केले. त्यांच्या प्रयत्नाला यश आले. हेलेनची गेलेली दृष्टी परत आली. काही काळानंतर त्या आत्मविश्वासाने कठीण परिश्रम करून इंग्रजी, लॅटीन, ग्रीक, फ्रेंच आणि जर्मन भाषांची विशेषज्ञ बनल्या. त्यांचे लिखाण विश्वविख्यात झाले. त्यांनी माझा धर्म, माझी जीवनकथा इत्यादी अनेक ग्रंथ लिहिले. त्या ग्रंथाच्या वाचनाने अनेक भटक्या लोकांना जगण्याची नवी दृष्टी मिळाली, नवा मार्ग सापडला. त्यांनी ब्रेल लिपीत सुध्दा अनेक ग्रंथरचना केली. त्यांच्या साहित्यामुळे त्या संपूर्ण विश्वात एक अद्भुत आणि महान महिला म्हणून प्रसिध्द झाल्या.

शारीरिक अपंगत्व माणसाच्या महानतेत व विकासात बाधा निर्माण करत नाही हेच खरे. एक कवी म्हणतात-

**तारीखे इतिहास बनायी करती है,**
**नये सृजनकी प्यास बढाया करती है,**
**जिनमें कुछ करनेका जज्बा होता है,**
**तिथियाँ उनको खास बनाया करती है।**

अर्थात : तिथीमुळे इतिहास घडतो, जो नवनिर्माणाची तृष्णा जागृत करतो की ज्यांच्यात काही करावयाची शक्ती असते. येणारे दिवस त्यांना विशेष व्यक्ती बनवितात.

*अनुवाद* : **श्रीमती चारुशीला एखंडे,**
*सोलापूर.*

*डॉ. भवरलालजी... पान 11 वरून*

तेथे जाऊन सारे प्रत्यक्ष पाहणे, डोळ्यात मनात साठवून घेऊन अनुभवणे व भाग्यात असेल तर भवरलालजींची भेट व दर्शन घडणे हा असामान्य अनुभव आहे जो नवी दृष्टी व दिशा देतो. सामान्यांच्या मनात नवी स्वप्नेही जागवतो, प्रेरणा देतो.

आपल्या देशाला आज गरज आहे ती माननीय भवरलालजीसारख्या दृष्ट्या उद्योगपतींची, म्हणूनच जैनबोधकाच्या वाचकासाठी या लेखाचा नजराणा. ❑❑

संस्थापक



हिराचंद नेमचंद दोशी

स्थापना-1884

धर्मवीर रावजी सखाराम दोशी स्मारक संघ द्वारा संचलित

ISSN 2229 - 5852 JAINBODHAK

R.N.I. No. MAH MAR/2000/1741

# जैनबोधक

संवर्धक



ध.रावजी सखाराम दोशी

'कल्याण भवन', 75, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-413002. ☎ 0217-2325211.

jainbodhaka@gmail.com संपादक- डॉ. महावीर प्रभाचंद्र शास्त्री *M.A., Ph.D., B.J.M.C.* mahaveershastri@yahoo.com

Ref. No. 325 Date 25-3-2013

Tamish
Keep the article in our collection

प्रति,

**मा. पद्मश्री भंवरलालजी जैन,**

जळगांव यांना-

सादर जयजिनेंद्र,

महोदय,

आपले बहुआयामी व परोपकारी जीवन हे समाजाला प्रेरणा देणारे आहे. याचीच प्रेरणा घेऊन अनेकांनी आपल्या जीवनक्रमावर आणि विविध समाजोपयोगी कार्यावर पुस्तके लिहिली आहेत. त्याची माहिती समाजाला व समाजाच्या प्रत्येक घटकाला व्हावे या दृष्टीने सुप्रसिद्ध लेखिका सौ. सुरेखा शहा यांना शतकोत्तर प्रसिद्ध होणाऱ्या जैनबोधकात लेख लिहिण्यास विनंती केली होती. त्याप्रमाणे त्यांनी लिहिलेला लेख प्रस्तुत अंकात प्रसिद्ध केला आहे.

महाराष्ट्रात जैनबोधकाचा मोठा वाचकवर्ग आहे. हा लेख प्रसिद्ध झाल्यानंतर अनेकांच्या उत्स्फूर्त प्रतिक्रियाही आल्या आहेत. आपले जीवन असेच अनेकांना प्रेरणादायी ठरो हीच मंगल भावना.

सधन्यवाद!

आपला,

महावीरशास्त्री

**डॉ. महावीर प्रभाचंद्र शास्त्री**

(संपादक)

सोबत : जैनबोधक फेब्रुवारी-२०१३ अंक